# पोलीस आयुक्तालय
## मिरा-भाईंदर, वसई-विरार

सेक्टर ०५, रामनगर शांती-गार्डन,मिरारोड (पुर्व) ठाणे ४०११०७
Email ID- dcphq.mb-vv@mahapolice.gov.in


जा.क्र.:- वि.शा/टे-१३/नायलॉन मांजा/मनाई आदेश/२०२५-४३९ दिनांक:-१७/०१/२०२५

## भारतीय नागरिक सुरक्षा संहिता सन २०२३ कलम १६३ (१), (२) अन्वये मनाई आदेश

वाचले:- १. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता सन २०२३ कलम १६३ (१), (२)
२. संदर्भ क्र. १. मा. उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेश दिनांक ३०/१२/२०२० व दिनांक ३१/१२/२०२०
३. शासकिय अभियोक्ता मा. उच्च न्यायालय, खंडपीठ औरंगाबाद यांचे पत्र क्र. CIVIL/DRK/6990/2020 दिनांक- ३१/१२/२०२०.

ज्या अर्थी, दर वर्षी बऱ्याच ठिकाणी "पतंग उत्सव" कार्यक्रमाचे आयोजन केले जाते. दरम्यान असे निदर्शनास आले आहे कि, नायलॉन मांजा यामुळे पक्षी व मानवी जिवीतास इजा पोहचली जाते. त्यामुळे मानवी जिवीताचे तसेच पक्षांचे नायलॉन मांजा पासुन संरक्षण करणे गरजेचे आहे.

ज्या अर्थी, प्लास्टिक किंवा कृत्रिम वस्तुचा वापर करुन बनविण्यात आलेल्या व सर्वसाधारणपणे "नायलॉन मांजा" हा अनाशवंत असल्याने तो बराच कालावधी करीता निसर्गात तसाच राहतो. त्यामुळे पर्यावरणाला हानी पोहचते. हा मांजा अनाशवंत असल्यामुळे गटारे व नाले या ठिकाणी तसेच अडकुन राहतो. त्यामुळे सार्वजनिक सांडपाणी व्यवस्था खराब होते. तसेच सदरचा मांजा हा जमिनीवर तसाच पडुन राहिल्याने जनावरे विशेषत: गाई, म्हशी इत्यादी यांच्या पोटात जावुन त्यांच्या जिवीतास धोका उत्पन्न होवु शकतो.

ज्या अर्थी, नायलॉन मांजा हा प्लास्टिक (नायलॉन) या कठीण पदार्थापासुन बनविला जातो. पतंग उडविण्याच्या दरम्यान हा मांजा विद्युत वाहिनी तसेच उपकेंद्र या ठिकाणी अडकुन राहुन विद्युत पुरवठयामध्ये समस्या निर्माण करु शकतात. तसेच त्या द्वारे विद्युत उपकरणांमध्ये बिघाड होवुन दुर्घटना होण्याची शक्यता असते.

ज्या अर्थी, आकाशात मुक्त विहार करणाऱ्या पक्षांच्या जिवीताची काळजी घेणे आवश्यक आहे. पक्षांच्या काही प्रजाती या दुर्मिळ असुन त्या नामशेष होत आहेत. त्यांचे संवर्धन व जतन करणे गरजेचे आहे. मिरा-भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात मकर संक्रांती सणाच्या निमीत्ताने मोठया प्रमाणत पतंगोत्सवाचे आयोजन केले जाते.

त्या अर्थी, मी **सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)**, मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन भारतीय नागरिक सुरक्षा संहिता सन २०२३ कलम १६३ (१), (२) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रात प्लास्टिक व कृत्रिम साहित्य वापरुन तयार करण्यात आलेला **"नायलॉन मांजा"** ज्यामुळे पक्षी तसेच मानवी जिवीतास गंभीर दुखापत होण्याची शक्यता आहे अशा नायलॉन मांजाची उत्पादन, विक्री व साठवणुक यावर मनाई करीत आहे.

Scanned with OKEN Scanner

सदरचा मनाई आदेश दिनांक १४/०१/२०२५ रोजी ००.०१ पासुन ते दिनांक १३/०३/२०२५ रोजी २४.०० वाजे पावेतो अंमलात राहील. सदर मनाई आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या इसमांवर भारतीय न्याय सहिंता २०२३ चे कलम २२३ (क), (ख) प्रमाणे कारवाई करण्यात येईल.

सदर मनाई आदेशाने प्रभावीत होणाऱ्या व्यक्तींना स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता सन २०२३ कलम १६३ (१), (२) अन्वये सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे. याबाबतची माहिती प्रसारमाध्यमे, संबधित पोलीस ठाणे, सहा. पोलीस आयुक्त तसेच परिमंडळीय पोलीस उप आयुक्त यांचे कार्यालयातील नोटीस बोर्डवर नागरिंकाचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश माझ्या सही शिक्यानिशी आज दिनांक 13 /०१/२०२५ रोजी दिलेला आहे.

(सुहास बावचे)
पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
मिरा-भाईंदर, वसई-विरार आयुक्तालय

प्रत:-

१. मा. पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांना सविनय सादर.
२. मा. अपर पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांना सविनय सादर.
३. मा. जिल्हाधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी, ठाणे, पालघर यांना सविनय सादर.
४. सर्व परिमडळीय पोलीस उप आयुक्त,मि.भा.व.वि.
५. सर्व सहायक पोलीस आयुक्त, मि.भा.व.वि.
६. सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, मि.भा.व.वि.
७. नस्तीकरिता

प्रसिद्धीसाठी,

१. शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, चर्नी रोड, मुंबई.
२. मा. अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.
३. मा. जिल्हा प्रसिद्ध अधिकारी ठाणे, पालघर यांना बातमी मधुन प्रसिद्धीसाठी.

Scanned with OKEN Scanner